**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (पूर्व),**
**ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०५.**

प्रगतीचा प्रकाश हाच बहुजन विकास
वसई-विरार शहर महानगरपालिका
स्थापना : ३ जुलै २००९

**दूरध्वनी :** ०२५० - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६
**फॅक्स :** ०२५० - २५२५१०७
**ई-मेल :** vasaivirarcorporation@yahoo.com


**जावक क्र. :** व.वि.श.म./विधी/30/2021
**दिनांक :** 29/06/2021

## जाहिर सुचना

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या न्यायालयीन कायदेविषयक बाबी पाहण्यासाठी महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर अतिरिक्त वकील व सिनियर काऊंसिलर यांची तीन वर्षांकरीता नेमणूक करणेबाबत

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर महानगरपालिकेच्या वतीने न्यायालयीन कामकाज करणेकरीता खालीलप्रमाणे अतिरिक्त वकील/सिनियर काऊंसिलर यांची तीन वर्षांकरीता नेमणूक करावयाची आहे;

| अ.क्र. | न्यायालयाचे नांव | आवश्यक संख्या |
|---|---|---|
| १. | मा.उच्च न्यायालय | वकील - दोन, सिनियर काऊंसिलर - एक |
| २. | मा.कामगार व औद्योगिक न्यायालय | वकील - एक |
| ३. | मा.मानवी हक्क आयोग (Human Rights Commission) | वकील - एक |
| ४. | Slum Tribunal | वकील - एक |
| ५. | Consumer Disputes Redressal Comission | वकील - एक |
| ६. | NGT (National Green Tribunal) | वकील - एक |
| ७. | NCLT (National Company Law Tribunal) | वकील - एक |
| ८. | MACT (Motor Accidents Claims Tribunal) | वकील - एक |
| ९. | MAT (Maharashtra Administrative Tribunal) | वकील - एक |
| १०. | मा.वसई न्यायालय | वकील - एक |

त्यादृष्टीने इच्छूक वकील/वकीलांची संस्था यांचेकडून वसई-विरार शहर महानगरपालिका, विधी विभाग, चौथा मजला, प्रभाग समिती 'सी', बहुद्देशिय इमारत, विरार (पूर्व) येथे संपुर्ण तपशिल व कागदपत्रांसहित दि.१५/०७/२०२१ सायं. ०४.०० वाजेपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. विलंबाने प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

महानगरपालिकेच्या वतीने करावयाचे न्यायालयीन कामकाजासाठी ठरविलेले दर, अटी शर्ती व अर्जाचा नमुना महानगरपालिकेच्या https://vvcmc.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सदर दरसूची व अटी शर्तीची संकेतस्थळावरून इच्छूक वकील/वकीलांची संस्था यांनी प्रिंट आऊट काढून सदर दर व अटी शर्ती मान्य असलेबाबत स्वाक्षरी करून अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

वकीलांच्या पॅनलच्या नियुक्तीबाबत मा.आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहील.

जावक क्र.वविशम/विधी/३०/२०२१
दिनांक : २९/०६/२०२१

सही/-
उप-आयुक्त (विधी)
वसई-विरार शहर महानगरपालिका

## वसई-विरार शहर महानगरपालिका
## ता.वसई, जि.पालघर

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर अतिरिक्त वकील व सिनियर काऊंसिलर यांची तीन वर्षाकरीता नेमणूक करणेबाबत तसेच वकील/सिनियर काऊंसिलर यांना न्यायालय/न्यायाधिकरण निहाय मंजुर असलेले दर खालीलप्रमाणे आहेत;

### मा.उच्च न्यायालय

| अ.क्र. | दाव्यांचे प्रकार/कामाचे टप्पे | मंजूर दर (रूपये) | |
|---|---|---|---|
| १. | महानगरपालिकेविरूध्द याचिका/अपिल/जनहित याचिका मध्ये शपथपत्र दाखल झाल्यानंतर ६0% रक्कम | **६0% रक्कम** | **एकूण रक्कम रूपये** |
| | कनिष्ठ वकिल | ९,000/- | १५,000/- |
| | वरिष्ठ वकिल | १५,000/- | २५,000/- |
| | सिनियर काऊंसिलर (एखाद्या प्रकरणाच्या गांभिर्याप्रमाणे दरामध्ये वाटाघाटी करून चढ-उतार करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांचेकडे राखीव असतील) | | १,00,000/- |
| | महानगरपालिकेविरूध्द याचिका/अपिल/जनहित याचिका मध्ये अंतिम निर्णयानंतर ४0% रक्कम | **४0% रक्कम** | |
| | कनिष्ठ वकिल | ६,000/- | |
| | वरिष्ठ वकिल | १0,000/- | |
| २. | महानगरपालिकेच्या वतीने याचिका/अपिल दाखल झाल्यानंतर ५0% रक्कम | **५0% रक्कम** | **एकूण रक्कम रूपये** |
| | कनिष्ठ वकिल | १0,000/- | २0,000/- |
| | वरिष्ठ वकिल | १५,000/- | ३0,000/- |
| | सिनियर काऊंसिलर (एखाद्या प्रकरणाच्या गांभिर्याप्रमाणे दरामध्ये वाटाघाटी करून चढ-उतार करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांचेकडे राखीव असतील) | | १,00,000/- |
| | अपिलातील अंतिम निर्णयानंतर साक्षांकित प्रत प्राप्त झाल्यानंतर ५0% रक्कम (सदर अपिल दाखल करणेकरीता Processing Fee / भरावी लागणारी कोर्ट फी ची रक्कम महानगरपालिकेने भरणा करावी) | **५0% रक्कम** | |
| | कनिष्ठ वकिल | १0,000/- | |
| | वरिष्ठ वकिल | १५,000/- | |
| ३. | महानगरपालिकेमार्फत सिव्हील ॲप्लीकेशन दाखल केल्यास अंतिम निर्णयानंतर | | एकूण रक्कम रूपये १0,000/- |
| ४. | महानगरपालिकेविरूध्द दाखल होणारे सिव्हील ॲप्लिकेशन (For Interim Relief) | | एकूण रक्कम रूपये ५,000/- |
| ५. | न्यायालयीन प्रकरणांमध्ये साक्षांकित प्रती काढणेकरीता | | एकूण रक्कम रूपये १,000/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | कॅव्हेट दाखल करणेकरीता | | एकूण रक्कम रूपये ५,000/- |
| ७. | लिगल नोटीस तयार करून बजावणेकरीता | | एकूण रक्कम रूपये ३,000/- |
| ८. | साधी मायनर नोटीस तयार करून बजावणेकरीता | | एकूण रक्कम रूपये २,000/- |
| ९. | अभिप्राय व कायदेशिर सल्ला देणेकरीता | | एकूण रक्कम रूपये ५,000/- |
| १0. | नगररचना विभागाशी संबंधित बांधकाम परवानगी विषयी सल्ला (O.C., C.C., R.D.T., T.D.R.) | | एकूण रक्कम रूपये ५,000/- |
| ११. | करारनामा<br>१. करारानुसार मसुदा तयार करून देणेकरीता<br>२. कराराचे परिक्षण करून देणेकरीता | | एकूण रक्कम रूपये<br>५,000/-<br>३,000/- |

**मा.कामगार न्यायालय**

| अ.क्र. | दाव्यांचे प्रकार/कामाचे टप्पे | मंजूर दर (रूपये) |
|---|---|---|
| १. | कॅव्हेट दाखल करणेकरीता | एकूण रक्कम रूपये २,000/- |
| २. | न्यायालयीन दावे | एकूण रक्कम रूपये ८,000/- |

**मा.औद्योगिक न्यायालय**

| अ.क्र. | दाव्यांचे प्रकार/कामाचे टप्पे | मंजूर दर (रूपये) |
|---|---|---|
| १. | कॅव्हेट दाखल करणेकरीता | एकूण रक्कम रूपये २,000/- |
| २. | न्यायालयीन दावे | एकूण रक्कम रूपये ८,000/- |

**मा.न्यायाधिकरण/आयोग**

| अ. क्र. | दाव्यांचे प्रकार | कामाचे टप्पे | मंजूर दर (रूपये) |
|---|---|---|---|
| १. | Slum Tribunal | निकाल लागलेनंतर देय | १५,000/- |
| २. | Consumer Disputes Redressal Comission | निकाल लागलेनंतर देय | १५,000/- |
| ३. | Human Rights Commission | निकाल लागलेनंतर देय | १५,000/- |
| ४. | MACT (Motor Accidents Claims Tribunal) | निकाल लागलेनंतर देय | १५,000/- |

| मा.न्यायाधिकरणे (Tribunals) | | | |
|---|---|---|---|
| अ. क्र. | दाव्यांचे प्रकार | कामाचे टप्पे | मंजूर दर (रूपये) |
| १. | NGT (National Green Tribunal) | निकाल लागलेनंतर देय | १५,000/- |
| २. | MAT (Maharashtra Administrative Tribunal) | निकाल लागलेनंतर देय | १५,000/- |
| ३. | NCLT (National Company Law Tribunal) | निकाल लागलेनंतर देय | १५,000/- |

| मा.लवाद न्यायाधिकरण (Arbitration Tribunal) | | |
|---|---|---|
| अ. क्र. | कामाचे टप्पे | मंजूर दर (रूपये) |
| १. | महानगरपालिकेच्या वतीने शपथपत्र/प्रतिज्ञापत्र/लेखी जबाब/पुरावे/दस्तऐवज इ. दाखल करणेकरीता | १५,000/- |
| २. | प्रत्येक सुनावणीस हजर राहणेकरीता | १५,000/- |

| अ.क्र. | दाव्याचा प्रकार | दाव्याचा टप्पा | टप्पानिहाय अदा करावयाची फी (रूपये) | दाव्याबद्दलची एकुण फी (रूपये) |
|---|---|---|---|---|
| १. | **वसई दिवाणी न्यायालयात** मनपाविरूध्द दाखल दावे | १. वकालतनामा दाखल करणे (Filling of VP)<br>२. लेखी विधान दाखल करणे (Filling of W.S.)<br>३. Exhibit 5 युक्तिवाद व आदेश (Exhibit 5 argument followed by Order)<br>४. सुनावणी (Hearing)<br>५. अंतिम युक्तिवाद व आदेश/निर्णय/हुकुम (Final argument followed by order/ judgment / decree) | २000/-<br>२000/-<br>१५00/-<br>४५00/-<br>२000/- | एकुण रक्कम रू.१२000/- |
| २. | **वसई जिल्हा न्यायालयात** मनपाच्या वतीने किंवा मनपाच्या विरूध्द अपिल दाखल झाल्यास | १.वकालतनामा दाखल करणे (Filling of VP)<br>२.अंतिम युक्तिवाद व आदेश/निर्णय/हुकुम (Final argument followed by order/ judgment / decree) | ४000/-<br>६000/- | एकुण रक्कम रू.१0000/- |
| ३. | दिवाणी न्यायालयात अपिल | | | एकुण रक्कम रू.८000/- |
| ४. | निवडणूक दावे | | | एकुण रक्कम रू.८000/- |
| ५. | मोटर अपघात दावे | | | एकुण रक्कम रू.८000/- |
| ६. | न्यायालयीन आदेशाचा अंमलबजावणी संबंधीत दावे | | | एकुण रक्कम रू.८000/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७. | केव्हेट दाखल करणेकरीता | | | एकुण रक्कम रू.२५000/- |
| ८. | फौजदारी खटले<br>1. Summons Case<br>2. Warrant Case<br>3. Summery Case | १.वकालतनामा दाखल करणे (Filling of VP)<br>२.प्रतिवादीने केलेले बचावाचे विधान (Plea / Charge)<br>३.सुनावणी (Hearing)<br>४.अंतिम युक्तिवाद (Final argument)<br>५.निर्णय (judgment) | २000/-<br>२000/-<br>२000/-<br>२000/-<br>२000/- | एकुण रक्कम रू.१0000/- |
| ९. | Miscellaneous Applications (Civil/Criminal) | १.वकालतनामा दाखल करणे/अर्ज (Filling of VP / Application)<br>२.युक्तिवाद व आदेश (Argument followed by order) | ३000/-<br>३000/- | एकुण रक्कम रू.६000/- |
| १०. | नगर रचना विभागाशी संबंधीत बांधकाम परवानगी विषयी सल्ला (O.C., C.C., R.D.P., T.D.R.) | | | एकुण रक्कम रू.३000/- |
| ११. | करारनामा<br>१.करारानुसार मसूदा तयार करून देणेकरीता<br>२.कराराचे परिक्षण करून देणेकरीता | | | एकुण रक्कम<br>रू.३000/-<br>रू.२000/- |
| १२. | अभिप्राय व कायदेशिर सल्ला देणेकरीता | | | एकुण रक्कम रू.२000/- |
| १३. | Cases pertaining to Courts beyond Vasai, Thane, Palghar, Mumbai Juridiction | | | एकुण रक्कम रू.१२000/- + प्रवास खर्च |
| १४. | लोक आयुक्त न्यायालय | | | एकुण रक्कम रू.५000/- |
| १५. | न्यायालयीन प्रकरणामध्ये साक्षांकीत प्रती काढणे | | | एकुण रक्कम रू.५00/- |
| १६. | लिगल नोटीस तयार करून बजावण्याकरीता | | | एकुण रक्कम रू.१५00/- |
| १७. | साधी/मायनर नोटीस बजावण्याकरीता | | | एकुण रक्कम रू.१000/- |

## शैक्षणिक अहर्ता व कामाचा अनुभव

१. अभियोक्ता मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असावा.

२. अभियोक्ता बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा चा सनदधारक असावा.

३. अभियोक्त्यास १० वर्षापेक्षा जास्त स्वतंत्र न्यायालयीन कामाचा अनुभव असावा.

४. अभियोक्त्यास फौजदारी व दिवाणी न्यायालयाच्या कार्यपध्दतीचे उत्तम ज्ञान व अनुभव असणे आवश्यक आहे.

५. अभियोक्त्यास मराठी, इंग्रजी व हिंदी भाषांचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे.

६. अभियोक्त्यास कामगार कायदा; महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९; महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६; गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्रे (लिंग निवड प्रतिबंध) अधिनियम, १९९४; वैद्यकीय गर्भसमाप्ती अधिनियम, १९७१; बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन कायदा, १९४९; भूसंपादन कायदा; बायो मेडीकल वेस्ट मॅनेजमेंट ॲक्ट, १९९८; महाराष्ट्र पोलुशन कंट्रोलबोर्ड ॲक्ट, १९७४; पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६; महाराष्ट्र (शहरी भाग) वृक्षांचे संरक्षण व संवर्धन अधिनियम, १९७५; लवाद व समेट कायदा; ग्राहक सुरक्षा कायदा; कामगार कायदा; व महानगरपालिकेशी संबंधीत इतर कायद्यांचे उत्तम ज्ञान व सदर बाबतीत कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

## पॅनलवरील वकीलांना कराव्या लागणाऱ्या कामासंदर्भातील अटी व शर्ती

१. पॅनलवरील वकीलांनी महानगरपालिकेच्या वतीने वा महानगरपालिकेविरूध्द न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेल्या दाव्यांचे, फौजदारी केसेस, अपिले यांमध्ये महानगरपालिकेतर्फे कामकाज पाहणे.

२. विहित मुदतीत महानगरपालिकेतर्फे दाखल दावा अथवा केसेसमध्ये वकीलपत्र, कैफियत, जबाब, प्रतिज्ञापत्र, कॅव्हेट दाखल करणे.

३. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या पॅनलवर निवड झालेल्या वकीलांना वर्ग करण्यात आलेली प्रकरणे/दावे/खटले स्वत: चालवायची आहेत. सदर वर्ग झालेली प्रकरणे/दावे/खटले त्यांना परस्पर अन्य वकीलांना वर्ग करता येणार नाही.

४. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या संबंधित विभागांकडून प्राप्त झालेल्या प्रकरणांवर कायदेशिर विधिमत देणे.

५. न्यायालयीन प्रकरणांच्या व्यतिरिक्त करार, निविदा इ. बाबत मसुदालेखन करणे.

६. न्यायालयात दाखल महानगरपालिकेसंबंधित प्रकरणे/दावे/खटले संदर्भात पॅनलवरील वकीलांनी अतिशय गोपनियता बाळगणे आवश्यक आहे.

७. वसई-विरार शहर महानगरपालिकेने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे पॅनलवरील वकीलांना बंधनकारक राहील.

८. ज्या दाव्यांमध्ये महानगरपालिकेच्यावतीने वकील म्हणून काम पाहत आहेत किंवा सल्ला देत आहेत अशा दाव्यातील अन्य पक्षकारास त्यांना सल्ला देता येणार नाही, अथवा अशा पक्षकाराची महानगरपालिके विरूध्द असलेली प्रकरणे/दावे/खटले स्विकारता येणार नाही.

९. महानगरपालिकेच्या पॅनलवरील वकीलांना त्यांना वर्ग केलेल्या दाव्यांमध्ये मा.न्यायालयामार्फत पारित झालेले अंतरीम आदेश/निर्णय/हुकुम हे महानगरपालिकेच्या विधी विभागास वेळोवेळी कळविणे बंधनकारक राहील, तसेच दाव्यातील अंतरीम आदेश/स्थगिती आदेश/निर्णय/हुकुम व इतर कागदपत्रे विधी विभागास वेळोवेळी उपलब्ध करून देणे.

१०. महानगरपालिकेतर्फे वर्ग करण्यात आलेल्या दाव्यांची सद्यस्थिती (सुनावणीच्या तारखा तसेच आदेश पारित असल्यास) प्रत्येक महिन्याच्या शेवटी अहवाल स्वरूपी विधी विभागास उपलब्ध करून देणे.

११. महानगरपालिकेच्या पॅनलवर निवड झालेल्या वकीलांची नेमणूक प्रारंभिक काळ तीन वर्षाकरिता असेल आणि त्यांना वर्ग करण्यात आलेल्या प्रकरणे/दावे/खटले मधील समाधानकारक कामगिरी असेल तर पुढील कालावधी वाढविण्याबाबत विचारात घेता येईल.

१२. पॅनलवरील वकीलांना वर्ग करण्यात आलेल्या, प्रकरणे/दावे/खटले मधील त्यांच्या कामगिरीच्या आधारे त्यांची नेमणूक कोणत्याही वेळेस संपुष्टात येण्यास पात्र राहील. याबाबत मा. आयुक्त महोदय यांचा निर्णय अंतिम राहील.

१३. पॅनलवरील वकीलांना त्यांची फी (व्यावसायिक शुल्क) महानगरपालिकेतर्फे मंजूर असलेल्या दरानुसार अदा करण्यात येईल.

१४. फी (व्यावसायिक शुल्काचे) दर हे सर्व शासकीय करांसहीत असुन प्रचलीत शासन धोरणानुसार वजावटींस पात्र असेल.

१५. पॅनलवरील वकीलांनी महानगरपालिकेच्या दाव्यासंबंधी साप्ताहीक अहवाल सादर करणे बंधनकारक राहील.

१६. पॅनलवरील वकीलांनी न्यायप्रविष्ठ प्रकरणांचा निकाल लवकरात लवकर लागणेसाठी सर्वोपरीने प्रयत्न करणे आवश्यक असुन महानगरपालिकेच्या वतीने विहित मूदतीत व पूर्ण सामर्थ्याने बाजू मांडून महानगरपालिकेच्या बाजूने निकाल लावण्यासाठी प्रयत्न करणे बंधनकारक राहील.

१७. पॅनलवरील वकीलांना त्यांना वर्ग करण्यात आलेली प्रकरणे/कामे ही त्यांना उचित/योग्य कारणांशिवाय नाकारता येणार नाहीत. वकीलांना वर्ग करण्यात आलेले प्रकरण/काम त्यांनी उचित/योग्य कारणांशिवाय करण्याचे नाकारल्यास सदर वकीलाची पॅनलवरील नेमणूक रद्द होण्यास पात्र राहील. याबाबत मा. आयुक्त महोदय यांचा निर्णय अंतिम राहील.

१८. पॅनलवरील वकीलांना त्यांची शुल्काची देयके सादर करतेवेळेस त्यासोबत दाव्यातील रोजनामा, वकिलपत्र, आदेश आणि प्रकरणी मा. न्यायालयामार्फत वेळोवेळी झालेल्या आदेशांच्या प्रती सोबत जोडणे आवश्यक राहील.

१९. मा. न्यायालयात महानगरपालिकेतर्फे दाखल करावयाचा दावा अथवा कैफीयत/जबाब/प्रतिज्ञापत्र यांचा मसुदा दाखल करावयाच्या तारखेच्या किमान तीन दिवस आधी कळविणे आवश्यक राहील.

२०. महानगरपालिकेच्या वतीने वकीलांनी केलेल्या दाव्यासंदर्भात प्रयत्नांची शहानिशा व विश्लेषणाबाबत निर्णय घेण्यास पुढील अधिकार मा. आयुक्त महोदय वसई-विरार शहर महानगरपालिका यांस राहील.

२१. पॅनलसाठी निविदा प्रक्रीयेत रितसर सहभागी होणाऱ्या वकीलांचाच पॅनलसाठी विचार करण्यात येईल.

२२. आकस्मितरित्या किंवा अतितातडीच्या कारणांस्तव देशातील कोणत्याही न्यायिक प्राधिकरणासमोर महानगरपालिकेची बाजू मांडण्याकरीता तत्कालिन परिस्थितीनुसार वकिल/सिनियर काऊंसिलर नेमण्याचे व त्यांची फी अदा करण्याचे अधिकार मा. आयुक्त महोदय यांना राहतील.

**सही/-**
उप आयुक्त (विधी)
वसई-विरार शहर महानगरपालिका

वरीलप्रमाणे उच्च न्यायालय / कामगार व औद्योगिक न्यायालय / मानवी हक्क आयोग / Slum Tribunal / Consumer Disputes Redressal Commission / National Green Tribunal / National Company Law Tribunal / Motor Accidents Claims Tribunal / Maharashtra Administrative Tribunal / मा. वसई न्यायालय या न्यायालयात महानगरपालिकेच्या वतीने न्यायालयीन कामकाजाचे दर व अटी शर्ती (पृष्ठ क्र. १ ते ६) मान्य असुन त्यानुसार मी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर काम करण्यास तयार आहे.

(* वरीलपैकी लागु नसेल त्यावर काट मारावी)

(वकीलाचे/संस्थेचे नाव सही व शिक्का)

# अर्जाचा नमुना (APPLICATION FORM)

(वसई-विरार शहर महानगरपालिका विधी पॅनलवरील "वकील"☐/"सिनियर काऊंसिलर"☐ नियुक्तीसाठी अर्ज)

(FOR EMPANELMENT AS "ADVOCATE"☐/ " SR. COUNSEL" ☐ON LAW PANEL OF VVCMC)

प्रति,
मा . आयुक्त सो .
वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार
विरार पुर्व, ता . वसई, जि . पालघर, पिन ४०१ ३०५ .

१ . संपुर्ण नांव मराठी व इंग्रजी (कॅपिटल लेटर्स)

| संपुर्ण नांव | मराठी | ENGLISH (IN CAPITALS) |
|---|---|---|
| आडनांव | | |
| स्वत:चे नांव | | |
| वडिलांचे/पतीचे नांव | | |
| आईचे नांव | | |

२ . पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता (ADDRESS FOR COMMUNICATION)

| मराठी | ENGLISH (IN CAPITALS) |
|---|---|
| ................................................................<br>................................................................<br>................................................................<br>................................................................<br>................................ पिन कोड ..................... | ................................................................<br>................................................................<br>................................................................<br>................................................................<br>................................ PIN CODE ................. |

३ . संपर्क दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्र.(CONTACT NO.) : ................................................................................

४ . ई-मेल (E-MAIL) : ..........................................................................................................

५ . जन्म दिनांक (DATE OF BIRTH): ............................................ वय वर्षे (AGE YEARS): .......................

६ . बार काऊंसिल नोंदणी क्र./ BAR COUNCIL REGISTRATION No. ..........................................................

७ . शैक्षणिक अर्हता / EDUCATIONAL QUALIFICATIONS

| अ.क्र. Sr.No. | उत्तीर्ण केलेली परीक्षा Examination Passed | विद्यापिठ मंडळाचे नांव University/Board | उत्तीर्ण वर्ष Passing Year | टक्केवारी व श्रेणी Percentage/Grade |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |
| ६. | | | | |

८. कामाचा अनुभव (WORK EXPERIENCE)

| अ.क्र. Sr.No. | संस्थेचे नांव व पत्ता Name & Address of the Firm | कालावधी Duration | | एकुण कालावधी Total Experience |
|---|---|---|---|---|
| | | पासुन (From) | पर्यत (To) | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

८. अर्जासोबत खालील छायांकित सत्यप्रती जोडलेल्या आहेत (Following Xerox True Copies are attached)

(१) शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र व गुणपत्रिका (Educational Qualification Certificates and Marksheet) ☐
(२) बार काऊंसिल नोंदणी प्रमाणपत्र, ओळखपत्र, सनद (BAR Council registration certificate, ID, Sanad) ☐
(३) शाळा सोडल्याचा दाखला / जन्म प्रमाणपत्र (School Leaving Certificate / Birth Certificate) ☐
(४) पॅन कार्ड व आधार कार्ड (PAN Card and ADHAAR Card) ☐
(५) महानगरपालिकेने ठरविलेली दरसुची व अटी शर्ती मान्य असलेबाबत त्याखाली संमती दर्शविणारी स्वाक्षरी ☐
(Acceptance Signature showing consent for terms & conditions and rates fixed by municipal corporation)
(६) कामाच्या अनुभवाचा दाखला (Work Experience Certificate) ☐
(७) इतर कागदपत्र (असल्यास कृपया उल्लेख करावा) Other Documents (if any) kindly specify ..........................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

९. राष्ट्रीयत्व (Nationality) : ..........................................................................................................

१०. अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय ? (Is applicant domiciled in Maharashtra ?): होय / नाही (YES/NO)

**टिप : जे लागु नसेल त्यावर काट मारावी (strike out whichever is not applicable)**

मी असे प्रमाणित करतो की, वर नमुंद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर किंवा तदनंतर रद्द करण्यात येईल आणि माझे विरूध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

This is to certify that, abovementioned details are true and correct to the best of my knowledge & belief. I am fully aware that, in the event if found false or incorrect, my nomination liable to be cancelled at any stage of selection or thereafter and I will be liable for legal action.

ठिकाण :- अर्जदाराची स्वाक्षरी ................................

PLACE :- Signature ......................................

दिनांक :- (नांव ..............................................)

DATE :- (Name ......................................)